# न्यू ट्रेंड्स इन हाय्यर एज्युकेशन संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन



**देगलूर / प्रतिनिधी**

येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने संपादित केलेल्या रन्यू ट्रेंड्स इन हायर एज्युकेशनरया संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन अ.व्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दि.५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास संस्थेचे उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार ,सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार, कार्यकारिणी सदस्य सूर्यकांत नारलावार ,रवींद्र द्याडे,चंद्रकांत नारलावार, विजयकुमार उनग्रतवार यांची प्रमुख उपस्थिती होती. रन्यू ट्रेन्स इन हायर एज्युकेशनरहा संदर्भ ग्रंथ देगलूर महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त डॉ. सुदाम लक्ष्मण ,विभागप्रमुख. प्रा.ए.आर.डांगे प्रा. डॉ.विनय भोगले यांनी संपादित केला आहे. अध्ययन-अध्यापन पद्धतीत होत असलेले बदल, तंत्रज्ञानाचा उपयोग, त्याचा प्रभाव,नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रभाव, शिक्षणातील नवीन प्रयोग, प्रवाह ,शिक्षकांची बदलत चाललेली भूमिका तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा प्रक्रियेवर होणारा परिणाम,या व आदी विषयावर या पुस्तकात उहापोह करण्यात आला आहे. हे पुस्तक परिकल्पना प्रकाशन ,दिल्ली यांनी प्रकाशित केले आहे. सूत्रसंचालन डॉ. वा.रा. कत्तुरवार तर आभार पर्यवेक्षक पाटील एस.एन.यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तम कांबळे,अधीक्षक गोविंद जोशींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner